Vol No. : 1 Issue No : 2 Feb. 2015 ISSN No. : 2393-834X

NIERJ

# NEW INTERNATIONAL EMERGENT RESEARCH JOURNAL



Chief Editor
Asst. Prof. A . V. Hingmire

Prathmesh Prakashan
Prathmesh Prakashan, Aurangabad

ISSN - 2393-834X

# *NEW INTERNATIONAL*
# EMERGENT RESEARCH JOURNAL

## CONTENTS

*Vol. 1 Issue-II February 2015*


| Sr. No. | Title & Name of the Author(s) | Page No. |
|---|---|---|
| 1 | बौद्ध दर्शनातील मूल्यशिक्षणविषयक विचारांचा चिकित्सक अभ्यास<br>श्रीमती अंजली संभाजीराव बनसोडे | 1 |
| 2 | भूगोल विषयाच्या अध्यापनात माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाची भूमिका<br>प्रा. डॉ. वैजनाथ रघुनाथराव गंदगे | 6 |
| 3 | Gender difference between emotional Intelligence<br>Mr. Ramesh D. Waghmare | 9 |
| 4 | Innovation In Teacher Education<br>Prof. Shital Salve(Dumbere) | 21 |
| 5 | प्राचिन भारतीय शिक्षण पध्दती<br>प्रा. डॉ. झेड.एम. अली | 27 |
| 6 | कामतानाथ की कहानियों में अभिव्यक्त चेतना<br>निशाराणी महादेव देसाई | 31 |
| 7 | महिलाचें आर्थिक सबलीकरण<br>प्रा.डॉ.सौ. सुमित्रा विजय पवार | 35 |
| 8 | Self Help Groups: Challenges for Sustainable Development<br>M. Anjaneyulu | 40 |
| 9 | Diasporic Discourses in Bharati Mukharjee's novel "Jasmine"<br>Mr. M.B. Wagh, | 46 |
| 10 | विश्वविद्यालयीन महिला खिलाड़ियों के व्यक्तित्व आयाम मनस्तापिता का उनकी खेल संवेगात्मक बुद्धि पर सार्थक प्रभाव<br>डॉ भारत चालसे | 49 |
| 11 | माहिती तंत्रज्ञान आणि शिक्षक<br>प्रा. टोपलेवार एस.एस. | 55 |
| 12 | भारतातील दहशतवाद आणि सद्यस्थितीतील परिणाम व उपाययोजना<br>प्रा. रामदास भिमा गांगुर्डे, | 59 |

ORIGINAL ARTICLE

# भारतातील दहशतवाद आणि सद्यस्थितीतील परिणाम व उपाययोजना

प्रा. रामदास भिमा गांगुर्डे,
राज्यशास्त्र विभाग,
कला व वाणिज्य महाविद्यालय, दिंडोरी,
ता. दिंडोरी जि. नाशिक

**प्रस्तावना :**

आज दहशतवाद ही भारताबरोबरच जगातील सर्वच राष्ट्रासमोरील असलेले एक मोठे आव्हान आहे. दक्षिण आशिया हे आधुनिक काळातील दहशतवादाचे प्रमुख केंद्र मानले जाते. भारतातील दहशतवादाला भारतावर राज्य करुन गेलेल्या अनेक जुल्मी परकीय राजवटी आणि ब्रिटीश इंग्रज राज्यकर्ते जबाबदार आहेत. भारतात दहशतवाद हा ब्रिटीश निर्मितच आहे. तो तसा मर्यादित होता. आधुनिक काळात त्याचे स्वरुप अधिक उग्र बनले आहे. म्हणून प्रस्तुत विषयात भारतातील दहशतवाद आणि सद्यस्थितीतील परिणाम व उपाययोजनांचा शोध घेणे सर्व भारतीयांना महत्वाचे तसेच कर्तव्याचे आहे.

**अभ्यासपध्दती :**

शोध निबंध तयार करण्यासाठी अहवाल, वर्तमानपत्रे, इ. तसेच प्रत्यक्ष निरीक्षण याचा आधार घेतला आहे.

**शोध निबंधाची उद्दिष्टे :**

१. भारतातील प्रदेशात दहशतवादी कृत्यांना लोक कसे बळी पडू शकता याचा अभ्यास करणे.

२. भारतातील दहशतवाद निर्माण होण्यास विशिष्ट जाती, धर्म, वंश, राजकीय पक्ष, संघटना जबाबदार आहेत का याचा अभ्यास करणे.

३. दहशतवाद नियंत्रीत करण्यासाठी प्रभावी उपाययोजना सूचविणे.

**शोधनिबंधाचे गृहितके :**

भारतात सद्यपरिस्थितीत विस्कळीत आर्थिक, सामाजिक, राजकीय, औद्योगिक परिस्थितीचा परिणाम दहशतवादावर होतो.

**भारतात दहशतवादाचा उदय, विकास आणि स्वरुप :**

भारतातील दहशतवाद हा ब्रिटीश निर्मित आहे ब्रिटीश अधिकारी जनरल वड डायरने १ एप्रिल रोजी जालियनवाला बागेत जमलेल्या निरपराध भारतीयांवर गोळीबार करुन मोठ्या प्रमाणात हिंसा घडवून भितीचे वातावरण निर्माण केले होते. भारतातील परकिय राज्यकर्त्यांनी राजकीय हेतूने फोडा आणि राज्य करा हिंदू मूस्लिम संघर्ष घडवुन आणले ते आजपर्यंत आहेतच. राष्ट्रीय स्वातंत्र्याचे आंदोजन चिरडून टाकण्यासाठी अनेक भारतीय स्त्रीया, पुरुष, निरपराध गरीब जनतेची हिंसा केली आणि हिंसेची भिती कायम ठेवली. भारतीय जनतेत दहशतीचे वातावरण तेवत ठेवले.

स्वातंत्र्यानंतर आजही झुंडशाहीने भारताच्या विविध प्रदेशात वेगवेगळया रंगाच्या राजकारण्यांनी राजकीय स्वार्थातुन समाजातील विविध जाती धर्म, वंश, संस्कृतीच्या लोकांच्या भावना भडकावून त्यांच्यात संघर्ष, हिंसा, आणि सामान्यांच्या मनात भितीचे वातावरण निर्माण करुन दहशत पोहोंचवली जाते. भारतातील काही मुस्लिम, हिंदू कट्टरवादी संघटना भारतातच्या शत्रु राष्ट्रातून विशेषतः पाक पुरस्कृत जिहादी दहशतवाद्यांना आश्रय देवुन सामान्य लोकांची हिंसा घडवुन दहशतीचे वातावरण पेरत आहेत. सद्या भारतात पाक पुरस्कृत लष्कर-ए-तैयबा आणि जैश-ए-मोहंमद, अल-कायदा या उग्र दहशतवादी कारवाया करत आहेत. भारताच्या जम्मु काश्मिर, पं.बंगाल, आंध्रप्रदेश, छत्तीसगढ आणि समुद्रकिनाऱ्यालगतच्या राज्यात बॉम्बस्फोट हिंसक दहशतवादी कारवाया घडवून आणले जात आहे.

भारतात मुस्लिम उग्रवाद्याविरुध्द काही हिंदू उग्रवादी संघटनाही भारताच्या महत्वाच्या शहरांवर दहशतवादी हल्ले करतात. भारततील कष्टकरी, गरीब, निरपराध स्त्री पुरुषांची हिंसा घडवून सर्वसामान्यांत दहशतवाद निर्माण करतात. उदा. गोध्रा हत्याकांड, २००६ चा मालेगाव बॉम्बस्फोट, मुंबई दंगल, रेल्वेस्फोट मालिका, गुजरातमधील अक्षरधाम मंदिरावरील हल्ले, १३ डिसेंबर २००१ चा भारतीय संसदेवरील दहशतवादी हल्ला, २६/११/२००८ चा भारताच्या आर्थिक शहर मुंबईवरील हॉटेल ओबेरॉय, ताज आणि नरिमन हाऊसवरील मुस्लिम जिहादी उग्रवाद्यांचा दहशतवादी हल्ला, १९९१ मध्ये इंडियन प्रवासी विमान अपहरण दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहेत. भारतातील ४३५ जिल्ह्यापैकी २९० जिल्ह्यात आजही आदिवासी कष्टकरी कामगार स्त्री पुरुष आणि अल्पसंख्यांकावर वारंवार दहशतीचे, हिंसेचे हल्ले होतात. असुरक्षिततेची परिस्थिती निर्माण झाली आहे. भारतातील नक्षली संघटना उग्र बनुन निरपराध आदिवासी, पोलीस अधिकारी, प्रशासकीय कर्मचारी, अधिकारी यांना ठार मारणे, ओलीस ठेवणे, बदल्यात गुन्हेगारांच्या सुटकेसाठी हिंसा घडवून आणणे, उदा. गडचिरोली, भंडारा काही आदिवासी खेडेगावात भितीचे वातावरण तयार झाले. शेतमालक, भांडवलदार, धनिक शोषक वर्गाच्या विरोधात कामगार कष्टकरी गरीबात वारंवार होणारे संघर्षातन होणाऱ्या हिंसा हे दहशतवाद निर्माण करतात. समाजात हिंसेची भिती कायम निर्माण होते. त्यामुळे दहशतवादी याचा फायदा घेवुन कारवाया करतात. राज्याच्या सिमाप्रकरणीही हिंसा घडवल्या जातात.

**भारतात दहशतवादाचे परिणाम :**

**१. सामाजिक अस्थिरता :**

दहशतवादी कारवायामुळे भारतीय समाजात विशमता, अनाचार, गोंधळ, धर्म, जाती, संस्कृती, भेद, द्वेष, मत्सर तसेच अल्पसंख्यांकावर आदिवासी दलित स्त्रीयांवर होणारे हल्ले वाढले आहेत. समाजात बलत्कार, गुन्हेगारी प्रवृत्ती, अंमली पदार्थ, चोरी, दरोडे अवैध धंदे वाढुन समाजात असुरक्षितता बनली आहे.

**२. शेतकऱ्यांमध्ये दारिद्रय, नैराश्य, उदासिनता आली आहे :**

भारतीय समाजातील बेरोजगार तरुण, अशिक्षीत तरुण, गांजलेला, पिचलेला मोठया प्रमाणात आज नक्षली गुन्हेगारी प्रवृत्तीकडे, हिंसेच्या मार्गाकडे ओढत चालला आहे.

**३. उद्योग क्षेत्रातील गोंधळ :**

भारतातील दहशतवादी कारवायामुळे उद्योग क्षेत्रावर होणारे हल्ले वाढले. परकीय भाग भांडवल गुंतवणुकदार निरुत्साही झाले. मजुर,कष्टकरी कामगारांचे शोषण, गोंधळ तंटे वाढले. पर्यटनस्थळ व्यापारी संकुलावरील हल्याने राष्ट्रांचे आर्थिक नुकसान झाले एकुणच देशाचे आर्थिक नुकसान झाले.

**४. राजकीय अस्थिरता गोंधळ :**

भारतात राजकारण्यांनी स्वार्थासाठी चांगल्याकडे दुर्लक्ष करुन समाजात हिंसेचे वातावरण निर्माण केले. त्यातून आरोप प्रत्यारोप, प्रतिनिधीचे अपहरण व ओलीस ठेवणे, राजकीय हेतूने दहशत निर्माण करण्याचे प्रकार वाढले. एकुणच संक्षिप्त राज्य बनते.

**५.** अनैतिक कृती गुन्हेगार दहशतवाद्यांना नियंत्रित ठेवण्यास कायदा, सुव्यवस्थेचे अपयश आले आहे. भारतीय वायु-जल आणि भू-सीमांच्या सुरक्षेचे अपयश पाकपुरस्कृत घुसखोर दहशतवादी कारवायांनी भारतातील प्रदेशात हल्ले करुन हिंसेच्या प्रमाणात वाढ झाली. त्यांना आश्रय देणाऱ्यांचा शोध घेण्यास दहशतवाद्यांना रोखण्यास कायदा सुव्यवस्था कुचकामी ठरली.

**७. भारतातील दहशतवादी निर्मुलनाचे उपाय :**

१. भारतीय वायू-जल,भू सीमांचे प्रथम सुरक्षिततेची योजना करणे.

२. देशातील प्रत्येक जिल्हा, गांव, तालुक्यात आर्थिक, शैक्षणिक रोजगाराच्या संधी

३. देशातील प्रत्येक नागरीकांची विभागानुसार माहिती असणार कोडनंबर आणि ओहखपत्र अनिवार्य करण्यात आले आहे.

४. दहशतवादी हल्ले कारवाया करणाऱ्यांना पकडुन कायद्याने सिध्द केल्यानंतर फाशीची शिक्षा देण्यात यावी.

५. दहशतवादी कारवायांमध्ये सामील होणाऱ्या व्यक्तींच्या कुटूंबाची मालमत्ता जप्त करुन नुकसान भरपाई करुन घेण्यात यावी.

६. दहशतवाद किंवा निर्माण करणाऱ्या किंवा प्रोत्साहन देणाऱ्यांच्या संबंधी भारताच्या तालुका, जिल्हा, राज्यांत विभागात गुप्तचर यंत्रणा प्रभावी करुन संशयीत, व्यक्तींचे फोन रेकॉर्ड करण्यात यावे.

७. दहशतवादी केस संबंधीचे निकल वर्षाच्या आत निर्भिडपणे लावून त्यासंबंधीचा शिक्षा कमी करण्याचा राष्ट्रपतीचा अधिकार काढुन धेण्यात यावा.

८. जर शेजारील परकीय देश दहशतवाद्यांना प्रोत्साहन, आर्थिक, शस्त्र मदत देण्याचे सिध्द झाल्यास अशा देशाला दहशतवादी राष्ट्र येथील करुन त्याबरोबरचे व्यवहार त्वरीत बंद ठेवावेत संयुक्त राष्ट्र संघाकडुन कठोर कारवाई करण्यात यावी.

९. दहशतवादी गुन्हेगारासंबंधी अचुक माहिती देणाऱ्यास सरकारी नोकरीत समाविष्ट करुन त्याचे नाव गुप्त ठेवण्याची योजना करावी.

१०. भ्रष्टाचार निर्मुलनाची प्रभावी योजना कायदा, नियम प्रामाणिक निपक्षपाती अंमलबजावणी करणे.

११. दहशतवाद हिंसा घडवणाऱ्या व्यक्तीची बाजू घेणाऱ्या अन्य व्यक्ती, पक्ष, गट संघटना यांच्यावरही कठोर कारवाई करण्यात यावी.

१२. भारतीय प्रशासनात राजकारणात समाजकारणात स्वच्छ निस्वार्थी आदर्श बुध्दीमान, निकोप कार्यक्षम व्यक्तीची निवड करण्यात यावी.

१३. भारतातबरोबरच जगातील सर्व राष्ट्रांनी मिळून दहशतवादी कारवाया करणाऱ्या व्यक्ती, राष्ट्र, संघटनांवर कठोर शिक्षा कायदा राबवून आंतरराष्ट्रीय यंत्रणा उभी करणे प्रभावी करणे.

संदर्भ :

१. दै.सकाळ २१ जुन २००८

२. दै. सकाळ २० मे २००९

३. दै. सकाळ, गांवकरी, लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स

४. दै. सकाळ ११ एप्रिल २०१०